तीन उत्कृष्ट पीच

एक फ्रेंच लोककथा



तीन उत्कृष्ट पीच

एक फ्रेंच लोककथा

पुन:लेखन: सिंथिया डेफेलिस, मेरी डी मार्श

चित्रे: आइरीन त्रिवास

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन





फार फार वर्षापूर्वी दूर एका राज्यात एक लाल केसांची राजकुमारी राहात होती. तिच्या चेहऱ्यावर पिंगट रंगाचे ठिपके होते. ती स्वभावाने दयाळू होती तसेच बुद्धिमानसुद्धा होती. एके रात्री राजकुमारी निजण्यासाठी बिछान्यावर गेली. तिला बरे वाटत नव्हते. सकाळी जाग आल्यावर तिला बिछान्यातून उठणे अशक्य झाले. तिच्या अंगात ताकदच उरली नाही. तिचा आवाज क्षीण झाला. तिचे केस आणि चेहऱ्यावरचे ठिपके निस्तेज होऊ लागले.

राजा-राणीने साऱ्या राजवैद्यांना बोलावून घेतले. पण राजकुमारीला कोणता आजार झाला आहे, हे कुणीही सांगू शकले नाही. तिचे चिंताग्रस्त आई-बाबा तिच्या शेजारी बसले. राजकुमारी आपल्या क्षीण आवाजात कुजबुजली, “मला तीन उत्कृष्ट पीच फळे मिळाली तर मी पुन्हा पहिल्यासारखी बरी होईन.”

राजकुमारीची इच्छा राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. कित्येक निष्ठावंत लोक तिच्यासाठी राजवाड्यात उत्तमोत्तम पीच घेऊन गेले. पण त्यातील एकही पीच राजकुमारीला बरे करू शकेल इतके उत्कृष्ट नव्हते.

हळुहळू राजकुमारी मृत्युच्या समीप पोहोचू लागली. राजा निराश झाला. शेवटी त्याने घोषणा केली की जो कुणी राजकुमारीला बरे करू शकेल असे पीच आणेल, त्याच्याशी राजकुमारीचे लग्न लावून देण्यात येईल (त्या काळात पिता, विशेषतः राजा अशी आश्वासने देऊ शकत).

राज्यातील सारे तरूण आपापले पीच घेऊन राजवाड्यात पोहोचू लागले. सर्वच राजकुमारीला ओळखत होते आणि सर्वांनाच तिच्याशी लग्न करण्याची इच्छा होती. ते सारे राजवाड्याबाहेर रांगेत उभे राहिले.



राजधानीपासून दूर तीन भाऊ राहात होते. त्यांच्या घराच्या दारात पीच फळाचे झाड होते. राजाची घोषणा त्यांच्यापर्यंत पोहोचली. मग त्यांनीही राजकुमारीला बरे करण्यासाठी आपले नशीब अजमावयाचे ठरवले. प्रथम सर्वात मोठा भाऊ पीचच्या झाडाजवळ गेला. त्याने तीन उत्कृष्ट पीच काढले आणि तो राजवाड्याकडे निघाला. तो फार दूर गेला नसेल. त्याला रस्त्याकडेला एक वृद्ध स्त्री दिसली. आजवर त्याने तिला कधीच पाहिले नव्हते. त्याला थांबवून ती म्हणाली, “मुला, तुझ्या टोपलीत काय आहे?”





मोठ्या भावाने तिच्याकडे तुच्छतेने पाहिले आणि उद्धटपणे म्हणाला, “तुझ्यासारख्या लांब नाकाच्या म्हातारीबरोबर बोलायला मला वेळ नाही. तरीही सांगतो, माझ्या टोपलीत सशाच्या विष्ठेव्यतिरिक्त काहीही नाही.” “छान!” वृद्ध स्त्री म्हणाली. “सशाची विष्ठा आहे तर!”



दोघे आपापल्या वाटांनी निघून गेले. मोठा भाऊ राजवाड्यात पोहोचल्यावर रांगेत उभे न राहाता थेट प्रवेशद्वाराकडे गेला. त्याला राजकुमारीकडे नेण्यात आले. तो राजकुमारीच्या बिछान्याजवळ गेला आणि पीच देण्यासाठी त्याने टोपली उघडली. पण काय आश्चर्य! टोपलीत फक्त सशाची विष्ठा होती. मोठ्या भावाला पहारेकऱ्यांनी पकडले आणि अपमानित करून घरी पाठवले.

पुढल्या दिवशी सकाळी मधला भाऊ पीचच्या झाडाकडे गेला. तीन सुंदर, पिकलेले पीच घेऊन तो राजवाड्याकडे निघाला. तो फार दूर गेला नसावा. त्यालासुद्धा रस्त्याकडेला ती वृद्ध स्त्री दिसली. ती म्हणाली, “मुला, तुझ्या टोपलीत काय आहे?”
मधला भाऊ तुच्छतेने म्हणाला, “लांब नाकाचे म्हातारे! माझ्या टोपलीत घोड्याच्या खाद्याव्यतिरिक्त काही नाही.”



“व्वा!” वृद्ध स्त्री म्हणाली. “घोड्याचं खाद्य आहे तर!”
दोघे आपापल्या वाटेने निघून गेले. मधला भाऊ राजवाड्यात पोहोचला आणि थेट प्रवेशद्वाराजवळ गेला. त्याला राजकुमारीकडे नेण्यात आले. तो तिच्या शेजारी बसला आणि तिला पीच देण्यासाठी त्याने टोपली उघडली. पण आश्चर्य म्हणजे, टोपलीत घोड्याच्या खाद्याव्यतिरिक्त काहीही नव्हते. मधल्या भावाला पहारेकऱ्यांनी पकडले आणि चांगले झोडपून घरी पाठवले.

सर्वात लहान भावाने मोठ्या भावांबरोबर घडलेली गोष्ट ऐकली. तिसऱ्या दिवशी सकाळी, तो पीचच्या झाडाजवळ गेला. त्याने झाडावरून चार पीच काढले आणि तो राजवाड्याकडे निघाला. थोडे दूर गेल्यावर त्यालाही रस्त्याकडेला बसलेली वृद्ध स्त्री दिसली. तिने त्याला थांबवले आणि म्हणाली, “मुला, तुझ्या टोपलीत काय आहे?”

सर्वात छोट्या भावाने आपल्या टोपीला हात लावत तिला नमस्कार केला आणि म्हणाला, “माझ्याकडे छान पिकलेले पीच आहेत आणि मी राजकुमारीशी लग्न करणार आहे.”
“अरे व्वा! छान पिकलेले पीच आहेत तर!” वृद्ध स्त्री म्हणाली.
सर्वात छोट्या भावाने टोपलीतून एक पीच काढून तिला विचारले, “तुम्ही खाणार का पीच?”



वृद्ध स्त्रीने पीच घेतले. “तुझ्या या दयाळुपणाबद्दल हे घे माझ्याकडून,” असं म्हणत तिने सर्वात लहान भावाला एक चांदीची शिट्टी दिली. “तुला कशाचीही गरज लागली तर ही शिट्टी वाजव आणि तुझी इच्छा व्यक्त कर. तुला हवं ते आपोआप तुझ्या पुढ्यात हजर होईल. शिट्टी हरवली तर फक्त तीन वेळा टाळ्या वाजव, शिट्टी परत तुझ्या खिशात आलीच समज.”



“आभारी आहे,” सर्वात लहान भाऊ म्हणाला आणि मग दोघे आपापल्या वाटेने निघून गेले. सर्वात छोटा भाऊ राजवाड्यात पोहोचला. तो तेथील रांगेत शिस्तीत सर्वात शेवटी उभा राहिला. अखेरीस, राजकुमारीकडे जाण्याची त्याची पाळी आल्यावर त्याला नेण्यात आले. तो तिच्या बिछान्याशेजारी बसला आणि त्याने टोपली उघडली.

त्याने टोपलीतून काढलेले पीच पाहून राजकुमारी बिछान्यावर उठून बसली. पहिल्या पीचचा पहिला तुकडा दातांनी तोडताच तिच्या गालावरचे पिंगट ठिपके परतले. दुसऱ्या पीचचा तुकडा तोडताच तिचे लाल केस चमकू लागले. तिसऱ्या पीचचा तुकडा तोडताच, ती बिछान्यातून उडी मारून चक्क नाचू लागली.





आपली मुलगी बरी झाली हे पाहून राजाला खूप आनंद झाला. पण नंतर त्याने फाटके कपडे घातलेल्या गावरान मुलाकडे पाहिले. तो विचार करू लागला. आपण असे काही केले पाहिजे की दिलेले वचनही तुटणार नाही आणि या गरीब मुलाशी राजकुमारीचे लग्नही होणार नाही.

राजा सर्वात छोट्या भावाला म्हणाला, “तू राजकुमारीला बरे केलंस आणि तुला तिच्याशी लग्न करायचंय. मी दिलेला शब्द मोडणार नाही. पण तू माझ्या मुलीसाठी योग्य आहेस, हे आधी सिद्ध कर. माझ्याकडे शंभर ससे आहेत. तू त्यांना व्यवस्थित सांभाळलंस, तर मग माझ्या मुलीशी खुशाल लग्न कर.”



सर्वात छोट्या भावाला सशांसोबत गवताळ कुरणात पाठवण्यात आले. त्याला दिवसभर सशांवर देखरेख करायला आणि संध्याकाळी त्यांना पुन्हा राजवाड्यात आणायला सांगण्यात आले. ओळीने चार दिवस त्याला हेच काम करायचे होते. एकजरी ससा हरवला तर तो आपल्या कामात अपयशी ठरणार होता.

सर्वात छोटा भाऊ सशांवर देखरेख करू लागला. तिथे कुंपण नव्हते, भिंत नव्हती, सशांना एकत्र ठेवण्यासाठी काही सोय नव्हती. एक-एक करत ते उड्या मारत दूर निघून गेले. सर्वात छोटा भाऊ निराश झाला.



पण दुपारी उशीरा त्याला वृद्ध स्त्रीने दिलेली शिट्टी आठवली. त्याने शिट्टी वाजवली आणि इच्छा व्यक्त केली. मग सगळे शंभर ससे कानाकोपऱ्यातून पळत तिथे आले. ते सर्व एका रांगेत उभे राहिले, त्याचे हुकूम पाळू लागले, त्याला छान सलाम करू लागले आणि त्याच्या मागे सैनिकांसारखे कवायत करत राजवाड्याच्या प्रवेशद्वारापर्यंत चालत गेले.

राजाचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. त्याने हे दृश्य पाहिलेल्या अनेकांना विचारले, “या मुलाने हे कसं साध्य केलं?”

कुरणात काम करणाऱ्या माळ्याने राजाला चांदीच्या शिट्टीबद्दल सांगितले. राजाने काही करून ती शिट्टी मिळवण्याचे ठरवले.

पुढल्या दिवशी, राजाने राजकुमारीला काही कारण न सांगता सोन्याच्या नाण्यांनी भरलेली एक पिशवी देऊन कुरणात पाठवले. त्या मुलाकडून शिट्टी मागून, चोरून किंवा खरेदी करून आण, असे राजाने तिला सांगितले. सर्वात छोट्या भावाने राजकुमारीला येताना पाहिले. आता राजा आपल्यासमोर कोणती नवीन अडचण उभी करत आहे, असा प्रश्न त्याला पडला. तो गरीब असला, त्याचे कपडे फाटके असले तरी तो बरेच काही समजून चुकला. आपण अपयशी व्हावे अशीच राजाची इच्छा आहे, हे त्याच्या लक्षात आले.







राजकुमारीने त्याच्याकडे शिट्टी खरेदी करण्याची इच्छा व्यक्त केली. तो म्हणाला, “का नाही, राजकुमारी! या शिट्टीची किंमत शंभर सोन्याची नाणी आणि शंभर चुंबने इतकी आहे.”

राजकुमारीने आढेवेढे न घेता त्याला सोन्याची नाणी देऊन टाकली. पण....तिने यापूर्वी कधी कुणा तरूण मुलाला चुंबन दिले नव्हते. तिने सर्वात छोट्या भावाच्या डोळ्यांत पाहिले....आणि तिला जे दिसले, ते तिला आवडले. तिने आपला चेहरा पुढे केला, ओठांचा चंबू केला. सर्वात छोट्या भावाने तिला शंभर चुंबने दिली.

मग मुलाने तिला शिट्टी देऊन टाकली. ती शिट्टी घेऊन राजवाड्यात परतली आणि शिट्टी राजाकडे सोपवली.

त्या दिवशी दुपारी उशीरा, सर्वात छोट्या भावाने तीनदा टाळ्या वाजवताच शिट्टी त्याच्या खिशात परतली. शिट्टी वाजवून त्याने इच्छा व्यक्त केली. मग सगळे शंभर ससे कानाकोपऱ्यातून पळत तिथे आले. ते सर्व एका रांगेत उभे राहिले, त्याचे हुकूम पाळू लागले, त्याला छान सलाम करू लागले आणि त्याच्या मागे सैनिकांसारखे कवायत करत राजवाड्याच्या प्रवेशद्वारापर्यंत चालत गेले.





राजाला संताप आला. तिसऱ्या दिवशी त्याने राणीला सोन्याच्या नाण्यांच्या दोन पिशव्यांसह कुरणात पाठवले. मुलाकडून आपल्या पतीसाठी शिट्टी मागून, चोरून किंवा खरेदी करून आण, असे राजाने तिला सांगितले. मुलाने राणीला येताना पाहिले. तो मनात म्हणाला, “हे सगळं मला मनोरंजक वाटू लागलंय....” राणीने शिट्टी विकत घेण्याची इच्छा व्यक्त केली. मुलगा म्हणाला, “का नाही, महाराणी! या शिट्टीची किंमत आज दोनशे सोन्याची नाणी आणि दोनशे चुंबने इतकी आहे.”

राणी एक मितभाषी स्त्री होती. निराशेने तिने दोनशे सोन्याची नाणी मुलाला देऊन टाकली. राणीचे आयुष्य खूप एकाकी झाले होते. राजा राज्य करण्यात मग्न असे आणि पत्नीला पुरेसा वेळ देत नसे. त्यामुळे तिला दोनशे चुंबनांची कल्पना आवडली. ती पुढे झाली, मुलाभोवती आपले बाहु लपेटले आणि त्याला दोनशे चुंबने दिली.



मुलाने राणीला शिट्टी दिली. शिट्टी घेऊन राणी राजवाड्यात परतली आणि शिट्टी राजाकडे दिली.



पण त्या दिवशी दुपारी सर्वात छोट्या भावाने तीनदा टाळ्या वाजवल्या आणि शिट्टी त्याच्या खिशात परतली. त्याने शिट्टी वाजवली आणि इच्छा व्यक्त केली. मग सगळे शंभर ससे कानाकोपऱ्यातून पळत तिथे आले. ते सर्व एका रांगेत उभे राहिले, त्याचे हुकूम पाळू लागले, त्याला छान सलाम करू लागले आणि त्याच्या मागे सैनिकांसारखे कवायत करत राजवाड्याच्या प्रवेशद्वारापर्यंत चालत गेले. राजा पुन्हा संतापला. “मला वाटतं, आता मलाच त्या मुलाकडे गेलं पाहिजे. मीच हे काम नीट करू शकतो.”



मग चौथ्या दिवशी सकाळी, राजा स्वत: घोड्यावर स्वार होऊन, सोन्याची नाणी भरलेली पेटी घेऊन कुरणात गेला. मुलाने राजाला येताना पाहिले आणि त्याला हसू आले. राजाने शिट्टीबद्दल विचारले तेव्हा मुलगा उत्तरला, “का नाही महाराज, तुम्ही माझी शिट्टी खरेदी करू शकता. आज त्याची किंमत आहे, तीनशे सोन्याची नाणी.... आणि....तुम्हाला तुमच्या घोड्याच्या पार्श्वभागाचं चुंबन घ्यावं लागेल.”



रागाने बेभान होऊन राजा घोड्यावरून उतरला. खोगीरातून सोन्याच्या नाण्यांची पेटी काढून त्याने मुलाच्या पायांवर फेकली. मग तो घोड्याच्या पार्श्वभागाजवळ गेला. त्याने खिशातून रुमाल काढला, काळजीपूर्वक त्याची घडी केली आणि ही घडी त्याचे ओठ आणि घोड्याचा पार्श्वभाग यांच्यामध्ये धरली. ओठांचा चंबू करून तो पुढे झुकला, पण....

“महाराज!” सर्वात छोटा भाऊ म्हणाला.
“काय?” राजा तुच्छतेने बोलला.
“नाही,” मुलगा म्हणाला.
“काय नाही?”राजाने विचारले.
“रुमाल नाही वापरायचा,” मुलगा म्हणाला.
“काय म्हणालास?” राजाने डोळे मोठे करत अविश्वासाने विचारले.
“रुमाल नाही,” मुलगा म्हणाला.
राजाने मुलाकडे जळजळीत नजर टाकली आणि रुमाल जमिनीवर टाकला. त्याने चौफेर नजर टाकून कुणी बघत तर नाही, याची खात्री करून घेतली. मग एका क्षणात त्याने घोड्याच्या पार्श्वभागाचे चुंबन घेतले.





“आता मला शिट्टी दे,” राजा म्हणाला.
मुलाने शिट्टी राजाला देऊन टाकली. राजा राजवाड्यात परतला. पण त्या दिवशी दुपारी उशीरा सर्वात छोट्या भावाने तीनदा टाळ्या वाजवल्या आणि शिट्टी त्याच्या खिशात परतली. त्याने शिट्टी वाजवली आणि इच्छा व्यक्त केली. मग सगळे शंभर ससे कानाकोपऱ्यातून पळत तिथे आले. ते सर्व एका रांगेत उभे राहिले, त्याचे हुकूम पाळू लागले, त्याला छान सलाम करू लागले आणि त्याच्या मागे सैनिकांसारखे कवायत करत राजवाड्याच्या द्वारापर्यंत चालत गेले.





राजकुमारी, राणी, राजा आणि राजतत्वज्ञाने राजवाड्याच्या प्रवेशद्वारावर मुलाचे स्वागत केले. तत्वज्ञ राज्यातील सर्वात शहाणा माणूस होता. राजा त्याला म्हणाला, “सांग त्याला.”
राजतत्वज्ञ म्हणाला, “राजा शब्दांचा पक्का आहे. तू राजकुमारीशी लग्न करशील. पण आधी आणखी एक काम कर. तू आपण लग्नासाठी योग्य आहोत, हे सिद्ध केलं पाहिजेस.” तत्वज्ञाने स्फटिकासारखी स्वच्छ काचेची बादली घेतली आणि म्हणाला, “ही बादली सत्याने काठोकाठ भरून टाक.”

मुलाने बादलीकडे पाहिले आणि क्षणभर विचार करून म्हणाला,
“ठिकाय, तुम्हाला सत्यच हवं असेल, तर सत्यच मिळेल.”
मग तो राजकुमारीकडे गेला, तिच्या डोळ्यांत डोळे घालून बघू लागला, मंदपणे हसला आणि म्हणाला, “मी तुझं शंभरवेळा चुंबन घेतलं, हे सत्य आहे की नाही?”
राजकुमारी स्मित करत आनंदाने म्हणाली, “हो, हे सत्य आहे.”
“काय?” राजा अचंबित होऊन म्हणाला.





“एवढं सत्य पुरेसं आहे का?” मुलाने विचारले.
“अजिबात नाही. बादली अजून रिकामीच आहे,” राजा उत्तरला.
“ठिकाय महाराज,” म्हणत मुलगा राणीकडे गेला. “महाराणी, तुम्ही माझं दोनशेवेळा चुंबन घेतलं, हे सत्य आहे का?”
“होय,” राणी कुजबुजली, “हे सत्य आहे.”
“काय?” राजा किंचाळला.
“एवढं सत्य पुरेसं आहे का?” मुलाने विचारले.
“हो, हो, मला वाटतं आजच्या दिवसासाठी एवढं सत्य पुरेसं आहे,“ राणी चिंताग्रस्त होत म्हणाली.
“अजिबात नाही,” राजा म्हणाला. “राणीबद्दल आणखी काहीतरी ऐकायला मी उत्सुक आहे.”
पण त्याऐवजी मुलाने राजाकडे पाऊल टाकले. “महाराज, माझ्यासारख्या फाटके कपडे घातलेल्या गरीब मुलाने तुमच्यासारख्या राजाला घोड्याच्या पार्श्वभागाचं चुंबन घ्यायला लावलं, हे सत्य आहे का?”



"चमत्कार!" राजा ओरडला. "बादलीकडे बघा. त्यातून सत्य ऊतू चाललंय. फरशीवर सांडू लागलंय. मुला, आता आणखी सत्य सांगू नकोस. चला, लग्नाची तयारी सुरू करा."



मग सर्वात छोटा भाऊ आणि राजकुमारी यांचे मे महिन्यात लग्न झाले आणि ते सुखात राहू लागले.



समाप्त